# प्रकरण तिसरे

# केंद्र सरकार आणि प्रशासन

## (Union Government and Administration)

### अ. भारताचे राष्ट्रपती (The President of India) :-

विस्तृत भूमाग, वांशिक, भाषिक, धार्मिक व जातीय भिन्नता याचा विचार करता भारतासाठी संघराज्यात्मक व्यवस्था उपयुक्त ठरली आहे. यामागे भारताची राष्ट्रीय एकात्मता टिकावी हाच उद्देश आहे. भारतातील कार्यकारी मंडळाचा प्रमुख राष्ट्रपती असतो. संघ पातळीवर कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राष्ट्रपतीकडेच असतात. भारतात संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केल्यामुळे राष्ट्रपती हे कार्यकारी मंडळाचे नाममात्र कार्यकारी प्रमुख असून वास्तविक प्रमुख पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ असते. राष्ट्रपती हे नाममात्र प्रमुख असल्यामुळे त्यांना वास्तविक अधिकार देण्यात आले नाहीत. मात्र त्यांना काही अधिकार वहाल करण्यात आले आहेत. संघराज्यांची सर्वसत्ता त्यांच्या हाती केंद्रीत झाली असून त्यांच्यापेक्षा कोणताही व्यक्ती भारतात अधिकाराने, मानाने श्रेष्ठ नाही. भारताचे राष्ट्रपती देशाचे प्रथम नागरिक आहेत. ते देशाचे प्रमुख असून देशाची सर्व सत्ता त्यांच्या नावे चालते. ते भारताच्या तीनही दलाचे सरसेनापती आहेत. ते भारताच्या एकात्मतेचे किंवा एकतेचे प्रतिक आहेत. संकटकाळात अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्यांना मानाचे स्थान आहे. घटनेनुसार त्यांचे पद प्रतिष्ठीत, मानसन्मानाचे आहे. अशा हया महत्त्वपूर्ण पदाचे घटनेतील कलम ५२ ते ६२ मध्ये सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे.

**राष्ट्रपतीची निवडणूक :-**

राष्ट्रपती हा भारतीय प्रजासत्ताक राष्ट्राचा घटनात्मक प्रमुख असतो. प्रजासत्ताक राष्ट्राचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे त्याचा प्रमुख हा निर्वाचित असतो. त्यामुळे भारतातील राष्ट्रपतीचे पदही निर्वाचित आहे.



भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक प्रत्यक्ष जनतेद्वारे होत नसून ती अप्रत्यक्ष पध्दतीने होते. म्हणजे जनतेकडून निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीमार्फत राष्ट्रपतीची निवड होत असते. कारण भारतातील एकूण लोकसंख्या लक्षात घेता प्रौढ मतदानानुसार निवडणूक घ्यावयाची म्हटल्यास फारच गोंधळ व खर्चिक बाब झाली असती. तसेच प्रत्यक्ष निवडणुकीमुळे योग्य उमेदवार निवडून येईल याची शक्यता नाही. म्हणून राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्षरितीने होते.

भारतीय राज्यघटनेतील कलम ५४ नुसार राष्ट्रपतीची निवड एका निर्वाचक गणाद्वारे (Electoral college) होते. या निर्वाचक गणात खालील दोन प्रकारच्या मतदारांचा समावेश असतो.

१. भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्य.

२. भारतातील सर्व घटक राज्यांच्या विधानसभांतील निर्वाचित सदस्य.

१९९२ साली केलेल्या सत्तराव्या घटना दुरुस्तीने दिल्ली या राष्ट्रीय राजधानी प्रदेशाच्या आणि पुदूच्चेरी (पॉडिचेरी) या संघराज्य क्षेत्राच्या विधानसभांतील निर्वाचित सदस्यांचाही या निर्वाचक गणात समावेश करण्यात आला आहे.

**विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य -**

राष्ट्रपतीच्या निवडीसाठी भारतातील सर्व घटक राज्यांच्या विधानसभांच्या निर्वाचित सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे मात्र प्रत्येक घटक राज्यांच्या विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य एकसमान नाही. मताचे मूल्य निश्चित करतांना त्या राज्याची लोकसंख्या विचारात घेतली जाते. यासाठी राज्यघटनेतच एक सूत्र नमूद केले असून त्या सुत्रानुसार पुढील प्रमाणे विधानसभा निर्वाचित सदस्यांच्या मताचे मूल्य निश्चित केले जाते.

$$\frac{\text{संबंधीत राज्याची लोकसंख्या}}{\text{संबंधीत राज्यातील विधानसभेच्या निर्वाचित सदस्याची संख्या}} \div १००० = \text{संबंधीत राज्यातील विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांच्या मताचे मूल्य}$$

यासाठी २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेची आकडेवारी प्रकाशित होईपर्यंत १९७१ चीच जनगणना राष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी ग्राहय धरण्यात येईल, असे २००१ साली करण्यात आलेल्या ८४ व्या घटना दुरुस्ती अधिनियमाने निश्चित केलेले आहे.

उदा. १९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या विधानसभेतील निर्वाचित



Scanned with OKEN Scanner

सदस्यांच्या मताचे मूल्य पुढीलप्रमाणे आहे.

$$= \frac{\text{५०४१२२३५ (१९७१ सालची महाराष्ट्राची लोकसंख्या)}}{\text{२८८ (महाराष्ट्रातील विधानसभेतील निर्वाचित सदस्य)}}$$

१७५०४२ ÷ १०००

= १७५

म्हणून महाराष्ट्रातील विधानसभा सदस्यांचे मतमूल्य १७५.

१७५ x २८८ = ५०४०० एवढी महाराष्ट्रातील विधानसभा सदस्यांच्या मताच्या मूल्यांची बेरीज आहे.

अशाप्रकारे देशातील सर्व घटक राज्याच्या विधानसभांतील निर्वाचित सदस्यांच्या मतांचे मूल्य काढले जाते. त्या सर्वांचे मूल्य ५४९४७४ इतके आहे.

**संसद सदस्यांच्या मताचे मूल्य :-**

भारताचा राष्ट्रपती हा भारतीय संघराज्याचा घटनात्मक प्रमुख असल्याने त्यांच्या निवडणुकीत केंद्रीय कायदेमंडळ म्हणजे संसद व घटकराज्यांच्या विधानसभांना समान महत्त्व देऊन त्यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केलेला आहे. यासाठी संसदेच्या निर्वाचित सदस्यांचे एकूण मतमूल्य व सर्व घटक राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा सदस्यांचे मतमूल्य समान ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संसदेच्या प्रत्येक निर्वाचित सदस्यांच्या मतांचे मूल्य निश्चित करण्यासाठी खालील सूत्रांचा अवलंब केला जातो.

$$\frac{\text{सर्व घटक राज्यांच्या विधान सभांतील निर्वाचित सदस्यांची एकूण मते}}{\text{संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्यांची एकूण संख्या}} = \text{संसद सदस्यांचे मतमूल्य}$$

उदा. $$\frac{\text{५४९४७४}}{\text{(५४३+२३३)= ७७६}} = \text{७०८ संसद सदस्यांचे मतमूल्य}$$

७७६ x ७०८ = ५४९४०८ दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्यांची एकूण मते.

संसदेतील एकूण निर्वाचित सदस्य ७७६ (लोकसभा ५४३ + राज्यसभा



२३३) यांच्या मताचे मूल्य ७०८ येते. संसद सदस्यांचे एकूण मत मूल्य ५४९४०८ इतके होते. म्हणजे सर्व विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य आणि संसद सदस्यांच्या मतांचे मूल्य या सर्वांची बेरीज केल्यास निर्वाचित गणातील सदस्यांचे एकूण मत मूल्य निश्चित होते. जसे देशातील सर्व घटक राज्यांच्या विधान सभेतील सदस्यांचे मतमूल्य ५,४९,४७४ आणि संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचे मतमूल्य ५,४९,४०८. म्हणजेच एकूण मते १०,९८,८८२.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मतांचे मूल्य निश्चित केल्यानंतर राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीचा, एकल संक्रमणीय मताचा (Single Transferable Vote) व गुप्त मतदान पध्दतीचा अवलंब केला जातो. मतदारास प्रत्येक उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रमांक दर्शवून मत द्यावे लागते. म्हणजे जितके उमेदवार निवडणूकीस उभे आहेत तितक्यांना पसंतीक्रमांक देता येतो. उदा. १, २, ३, ४, ५.

**निवडून येण्यासाठी आवश्यक मते किंवा कोटा :-**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी उमेदवारास आवश्यक संख्येएवढी मते प्राप्त करावी लागतात. ही संख्या पुढील सुत्रानुसार निश्चित केली जाते.

$$\frac{\text{एकूण वैध मतसंख्या}}{\text{निवडून द्यावयाच्या प्रतिनिधीची संख्या +१}} + १ = \text{निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा)}$$

उदा. $$\frac{\text{१०९८८८२}}{\text{१ + १}} + १ = \text{कोटा}$$

= ५४८४४१ + १ = ५४९४४२ कोटा

**मतमोजणी :-**

मतमोजणीच्या वेळी सर्वप्रथम प्रथम पसंतीक्रमांकाची मते मोजली जातात. वरील सूत्रानुसार निश्चित केलेला कोटा पहिल्या फेरीतच एखाद्या उमेदवाराने पूर्ण केल्यास त्यांना निवडून आल्याचे घोषित केले जाते. कोणत्याच उमेदवाराला पहिल्या फेरीत आवश्यक असलेली मते प्राप्त झाली नसल्यास अशावेळी सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवारास स्पर्धेतून बाद केले जाते आणि त्याची दुसऱ्या

क्रमांकाची मते मोजली जातात व ती सर्व उमेदवारात विभागून दिली जातात. ही प्रक्रिया आवश्यक कोटा पूर्ण होईपर्यंत चालू असते. एखाद्यावेळी अशी परिस्थिती उद्‌भवते की, कोणताही उमेदवार आवश्यक तो कोटा पूर्ण करू शकत नाही तेव्हा सर्वाधिक मते ज्या उमेदवाराला प्राप्त होतील त्यास विजयी घोषित केले जाते. आजपर्यंतचे बहुतांश राष्ट्रपती पहिल्याच फेरीत निवडून आलेत. पण १९६९ च्या राष्ट्रपतीपदाची निवडणूक चुरशीची झाली. या निवडणुकीत दुसऱ्या पसंती क्रमांकाची मते मोजावी लागली. उदा. व्ही. व्ही. गिरींना दुसऱ्या क्रमांकाच्या मताच्या मोजणीनंतर विजयी घोषित करण्यात आले.

**पात्रता :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम ५८ मध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी पुढील अर्हता निश्चित करण्यात आली आहे.

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. त्यांच्या वयास पस्तीस वर्ष पूर्ण झाली असावीत.

३. लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.

४. एखादी व्यक्ती भारत सरकार, राज्यसरकार किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था यामध्ये प्राप्तीचा हुद्दा धारण करीत असेल तर ती व्यक्ती राष्ट्रपतीच्या निवडणुकीस पात्र समजली जाणार नाही. मात्र राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल व मंत्री या पदावर असणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रपती म्हणून निवडून येण्यास अपात्र समजले जाणार नाही.

५. राज्यघटनेतील कलम ५९ (१) नुसार राष्ट्रपती संसदसदस्य अथवा राज्यविधिमंडळाचा सदस्य असणार नाही. संसद सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहाचा सदस्य राष्ट्रपती म्हणून निवडून आला तर तो ज्या दिवशी राष्ट्रपतीपद धारण करील त्या दिनांकास त्याने त्या सभागृहातील आपली जागा रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.

६. राष्ट्रपतीस अन्य कोणतेही लाभाचे पद धारण करता येणार नाही.

वरील अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकास राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहता येते.

**सूचक, अनुमोदक व अनामत रक्कम :-**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवाराकरीता ५ जून



१९९७ रोजी काढलेल्या एका अध्यादेशानुसार ५० सूचक व ५० अनुमोदक म्हणून निर्वाचक गणतील सभासदांनी संमती नोंदवीलेली असली पाहिजे. तसेच प्रत्येक उमेदवारास रू. १५०००/- अनामत रक्कम भरावी लागते. एकूण मताच्या १/६ मते न मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होते.

**शपथ:-**

राष्ट्रपती म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीस पदग्रहण करण्यापूर्वी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांसमोर घटनेतील कलम ६० प्रमाणे त्यांना 'ईश्वर साक्ष किंवा सत्यनिष्ठापूर्वक मी भारताचा राष्ट्रपती म्हणून राष्ट्रपतीपदाची कार्ये पार पाडीन. माझ्या सामर्थ्यांची पराकाष्ठा करून संविधान व कायदा यांचे जतन, संरक्षण व बचाव करीन मी भारतीय जनतेच्या सेवेस व कल्याणास वाहून घेईन' अशी शपथ घ्यावी लागते.

**कार्यकाल :-**

राज्यघटनेतील कलम ५६ अन्वये भारताच्या राष्ट्रपतीचा कार्यकाल त्यांनी पदग्रहण केलेल्या दिवसापासून पाच वर्षांचा असतो. विद्यमान राष्ट्रपतीस त्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर त्या पदासाठी पून्हा निवडणूक लढविता येते. त्यांना आपला कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी स्वेच्छेने राजीनामा देता येतो. ते आपला राजीनामा उपराष्ट्रपतीकडे देतात. राज्यघटनेतील कलम ५६ (२) नुसार उपराष्ट्रपती राष्ट्रपतीच्या राजीनाम्याचे वृत लोकसभेच्या सभापतीला कळवितात. तसेच राष्ट्रपतीवर महाभियोगाचा खटला संमत झाल्यास त्यांना पदत्याग करावा लागतो. या शिवाय राष्ट्रपतीचे अकाली निधन झाल्यास पद रिक्त होते.

वरीलपैकी कोणत्याही कारणाने जर राष्ट्रपतीचे पद रिक्त झाल्यास भारताचे उपराष्ट्रपती राष्ट्रपतीचे अधिकार वापरतात. राष्ट्रपतीचे पद रिकामे झाल्यास सहा महिन्यांच्या आत नवा राष्ट्रपती निवडण्याची तरतूद राज्यघटनेत आहे. उपराष्ट्रपती राष्ट्रपती होत नाही. त्यांना निवडूनच यावे लागते. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षाचे पद रिक्त झाल्यास उर्वरित काळासाठी उपाध्यक्षच राष्ट्राध्यक्ष होतो. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधिश राष्ट्रपती म्हणून काम पाहतो. डॉ. झाकीर हुसेन हे राष्ट्रपती पदावर असतांनाच ०३ मे १९६९ रोजी त्यांचे निधन झाले. त्यावेळी व्ही. व्ही. गिरी हे उपराष्ट्रपती होते. त्यांनी राष्ट्रपतीपदाचा कार्यभार स्वीकारला. (०३ मे १९६९ ते २० जुलै १९६९) पुढे त्यांनी राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीसाठी राजीनामा दिला.



Scanned with OKEN Scanner

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त होऊन फार मोठा घटनात्मक पेचप्रसंग उद्भवला. तेव्हा १९६९ साली संसदेने 'द प्रेसिडेन्ट सक्सेशन ॲक्ट' पास केला व त्यात जर राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश राष्ट्रपती म्हणून काम पाहील. जर सरन्यायाधीशाचेही पद रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या ज्येष्ठ न्यायाधीशाकडे राष्ट्रपतीपदाचा पदभार सोपविला जाईल. त्यावेळी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश महमद हिदायतुल्ला होते. त्यांच्याकडे राष्ट्रपतीचा कार्यभार (२० जुलै ते २४ ऑगस्ट १९६९) सोपविला. ११ फेब्रुवारी १९७७ रोजी राष्ट्रपती फक्रुद्दील अली अहमद यांचे निधन झाले. या काळात उपराष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांनी राष्ट्रपतीचा कार्यभार सांभाळला.

**बडतर्फी किंवा महाभियोगाचा खटला :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम ६१ नुसार घटनाभंगाचा आरोप ठेवून राष्ट्रपतीवर महाभियोगाचा खटला चालविला जाऊ शकतो. आरोप सिध्द झाल्यास त्यांना बडतर्फ केले जाऊ शकते. त्यांच्यावर असा आरोप संसदेच्या कोणत्याही सभागृहात ठेवता येतो. यासाठी ज्या सभागृहात आरोप ठेवावयाचा आहे त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या किमान १/४ सदस्यांनी स्वाक्षरी करून हा आरोप दाखल करण्यासंबंधीची किमान चौदा दिवसांची पूर्वसूचना राष्ट्रपतीला देणे आवश्यक आहे. १४ दिवसानंतर हे आरोपपत्र सभागृहासमोर चर्चेस येते. त्या सभागृहात हे आरोपपत्र एकूण सदस्य संख्येच्या २/३ बहुमताने संमत होणे आवश्यक असते. अशाप्रकारे संसदेच्या एका सभागृहात आरोपपत्र संमत झाल्यास राष्ट्रपतीवर आरोप ठेवला आहे असे समजले जाईल. यानंतर हे आरोपपत्र चौकशीसाठी दुसऱ्या सभागृहासमोर येईल. दुसऱ्या सभागृहात या आरोपाची चौकशी होते. यावेळी राष्ट्रपती स्वत: किंवा आपल्या प्रतिनिधीमार्फत आपली बाजू मांडतील. चौकशी अंती दुसऱ्या सभागृहातही एकूण सदस्य संख्येच्या २/३ बहुमताने आरोपपत्र पारित झाल्यास राष्ट्रपतीवरील आरोप सिध्द झाल्याचे घोषित केले जाते. चौकशी करणाऱ्या म्हणजे दुसऱ्या सभागृहात ज्या दिनांकास व दिवशी आरोपपत्र पारित झाले त्या दिवसापासून त्यांना अधिकार पदावरून दूर व्हावे लागते किंवा त्यांना त्या दिवसापासून बडतर्फ केले जाते. मात्र सुदैवाने आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रपतीवर असा महाभियोगाचा खटला भरण्याचा प्रसंग आलेला नाही.



**वेतन, भत्ते आणि इतर सवलती :-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५९ (३) मध्ये त्यांना दिले जाणारे वेतन, भत्ते व इतर सवलतींच्या तरतूदी केलेल्या आहेत. राष्ट्रपतींना मिळणारे लाभ, भत्ते व विशेषाधिकार यांचा समावेश राज्यघटनेच्या दुसऱ्या अनुसूचीत करण्यात आला आहे. भारताच्या राष्ट्रपतीचे वेतन, भत्ते व इतर सवलती निश्चित करण्यासंबंधीचे अधिकार संसदेला असतात. त्यानुसार संसद वेळोवेळी कायदाकरून राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते ठरवित असते. एकदा वेतन निश्चित केल्यानंतर त्यांच्या कार्यकालात कमी केले जाऊ शकत नाही. जानेवारी २००७ पासून राष्ट्रपतीच्या वेतनात वाढ करण्यात आली असून सध्या राष्ट्रपतीला दरमहा रू. १,५०,०००/- वेतन दिले जाते. तसेच सहा लाख रूपये वार्षिक निवृत्तीवेतन देण्याची तरतूद केलेली आहे. या व्यतिरिक्त राष्ट्रपतीला भारत सरकारच्यावतीने मोफत निवासस्थानही पुरविण्यात येते त्यास **राष्ट्रपती भवन** असे म्हणतात. याशिवाय कार्यालयासाठी लागणारे अधिकारी, कर्मचारी व इतर सेवकवर्ग दिला जातो. त्यांना पदावर असतांना व सेवानिवृत्तीनंतरही वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. सेवानिवृत्तीनंतरही त्यांना सेवकवर्ग व कार्यालयासाठी काही रक्कम देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सेवानिवृत्ती नंतर जर त्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या पत्नीनांही अधिक सुविधा देण्याचा निर्णय डॉ. मनमोहसिंग यांच्या सरकारने घेतला असून तो जानेवारी २००७ पासून अंमलात आला आहे.

**आजपर्यंत झालेले राष्ट्रपती व त्यांचा कार्यकाल :-**

१. डॉ. राजेंद्रप्रसाद महादेवराय सहाय - २६ जाने १९५० ते १३ मे १९६२
२. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन - १३ मे १९६२ ते १३ मे १९६७
३. डॉ. झाकीर हुसेन - १३ मे १९६७ ते ३ मे १९६९ (मृत्यू)
४. श्री. व्ही. व्ही. गिरी - ३ मे १९६९ ते २० जुलै १९६९ (प्रभारी)
५. श्री. न्यायमूर्ती मोहमद हिदायतुल्ला - २० जुलै १९६९ ते २४ ऑगस्ट १९६९ (प्रभारी)
६. श्री. वराहगिरी वेंकटगिरी - २४ ऑगस्ट १९६९ ते २४ ऑगस्ट १९७४
७. श्री. फक्रुद्दीन अली अहमद - २४ ऑगस्ट १९७४ ते ११ फेब्रुवारी १९७७ (निधन)
८. श्री. बी. डी. जत्ती - ११ फेब्रुवारी १९७७ ते २५ जुलै १९७७ (प्रभारी)
९. श्री. निलम संजीव रेड्डी (बिनविरोध) - २५ जुलै १९७७ ते २५ जुलै १९८२



Scanned with OKEN Scanner

१०. श्री. ग्यानी झैलसिंग - २५ जुलै १९८२ ते २५ जुलै १९८७
११. श्री. आर. वेंकटरामन - २५ जुलै १९८७ ते २५ जुलै १९९२
१२. डॉ. शंकर दयाळ शर्मा - २५ जुलै १९९२ ते २५ जुलै १९९७
१३. श्री. के. आर. नारायणन् - २५ जुलै १९९७ ते २५ जुलै २००२
१४. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम - २५ जुलै २००२ ते २५ जुलै २००७
१५. श्रीमती प्रतिभा पाटील - २५ जुलै २००७ ते .....

**राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्ये**

**(Powers & functions of the President) :-**

भारतीय संविधानाने राष्ट्रपतीस व्यापक स्वरूपाचे अधिकार दिलेले आहेत. प्रत्यक्षात या अधिकारांचा वापर पंतप्रधान व मंत्रिपरिषदच करीत असते. कारण राष्ट्रपती नामधारी प्रमुख असतो. परंतु घटनात्मक तरतुदींचा विचार केल्यास जगातील अन्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांच्या तुलनेत भारताच्या राष्ट्रपतीला निश्चित अधिक अधिकार आहेत असेच म्हणावे लागते.

राष्ट्रपतींच्या अधिकारांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते.

१. कार्यकारी अधिकार
२. कायदेविषयक अधिकार
३. आर्थिक अधिकार
४. न्यायविषयक अधिकार
५. आणीबाणी विषयक अधिकार

**१. कार्यकारी अधिकार (Executive Powers) :-**

राष्ट्रपती केंद्राच्या कार्यकारी सत्तेचा प्रमुख असल्यामुळे केंद्राची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीकडे सोपविण्यात आली आहे. राष्ट्रपतीचे कार्यकारी स्वरूपाचे अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.

१. राष्ट्रपतीकडूनच पंतप्रधानाची नेमणूक केली जाते. तसेच पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार मंत्रिपरिषदेतील अन्य मंत्र्यांची नियुक्ती देखील राष्ट्रपतीच करीत असतो.

२. केंद्र सरकारचे सर्व आदेश राष्ट्रपतीच्या नावाने निघतात. संसदेच्या कायद्याची तोच अंमलबजावणी करीत असतो. देशाच्या प्रशासकीय यंत्रेणवर अंतिम नियंत्रण राष्ट्रपतीचेच असते.



३. केंद्रसरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका राष्ट्रपती करीत असतो. ज्यात भारताचा महान्यायवादी, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, घटक राज्यातील राज्यपाल, नायब राज्यपाल, महालेखापरिक्षक, मुख्य निवडणूक आयुक्त, परराष्ट्रात पाठविण्याचे राजदूत आदींचा समावेश होतो. नियोजन आयोग, वित्त आयोग, भाषा आयोग, केंद्रीय दक्षता आयोगावरील सदस्याची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारेच केली जाते. रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर, केंद्रशासित प्रदेशातील उच्चायुक्त यांच्या नेमणूका देखील राष्ट्रपतीच करीत असतो.

४. राष्ट्रपतीस राजनैतिक कार्येदेखील करावी लागतात. परराष्ट्राच्या वकीलांची अधिकारपत्रे स्वीकारणे, परराष्ट्रीय पाहुण्यांचे स्वागत करणे, आंतरराष्ट्रीय सभा संमेलनास उपस्थित राहून भारताचे तो प्रतिनिधीत्व करतो.

५. स्थलसेना, वायुसेना आणि नौसेना या सैन्याच्या तिन्ही दलाचा प्रमुख राष्ट्रपती असतो. सैन्यदलातील तिन्ही विभागाचे प्रमुख, सैन्यातील अन्य प्रमुख अधिकारी यांच्या नियुक्त्या राष्ट्रपती करीत असतो. तोच राष्ट्रीय संरक्षण समितीचा अध्यक्ष असतो. राष्ट्रप्रमुख म्हणून परराष्ट्राशी तह, करार, मैत्री करू शकतो.

६. उच्चायुक्ताच्या माध्यमातून केंद्रशासित प्रदेशाचा कारभार राष्ट्रपती पाहतो.

७. देशातील सामाजिक व राजकीय उत्सवांच्या प्रसंगी राष्ट्रपतीला प्रमुख अतिथी म्हणून सर्वश्रेष्ठ मानाचे पद स्वीकारण्याचा अधिकार आहे.

राष्ट्रपती आपल्या सर्व अधिकारांचा वापर पंतप्रधान व मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसार करीत असतो.

**२. कायदेविषयक अधिकार (Legislative Powers) :-**

संविधानातील कलम ७९ नुसार भारताच्या संसदेत राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभा यांचा समावेश होतो. राष्ट्रपती संसद सदस्य नसला तरी त्याला संसदेचा एक अविभाज्य घटक समजले जाते. भारतीय संविधानाने राष्ट्रपतीस पुढील कायदेविषयक अधिकार दिलेले आहेत.

१. संसदेच्या दोन्ही सभागृहाची अधिवेशने बोलावणे (वर्षातून किमान दोनदा संसदेचे अधिवेशन बोलाविण्यात यावे अशी राज्यघटनेत तरतूद आहे.) तहकूब करणे वा आवश्यकता वाटल्यास लोकसभेचे विसर्जन करणे हे अधिकार घटनेने राष्ट्रपतीस दिले आहेत. त्या खेरीज एखाद्या विशेष अधिवेशनाची गरज



Scanned with OKEN Scanner

भासल्यास तो बोलावू शकतो.

२. संसदीय निवडणूकीनंतर नव्या संसदेच्या कामकाजाची त्याचप्रमाणे नवीन वर्षातील पहिल्या अधिवेशनाच्या कामकाजाची सुरूवात राष्ट्रपतीच्या अभिभाषणाने व अभिभाषणावरील चर्चेने होत असते. राष्ट्रपतीच्या अभिभाषणात केंद्र सरकारच्या ध्येय धोरणांची आणि कार्याची रूपरेषा स्पष्ट केलेली असते.

३. राष्ट्रपती साहित्य, कला, विज्ञान, संस्कृती व शिक्षण आदी क्षेत्रामध्ये विशेष कामगिरी बजावलेले १२ सदस्य राज्यसभेवर नामनिर्देशित करतो. तसेच लोकसभेत ॲंग्लो-इंडियन जातीना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नाही, असे राष्ट्रपतीस आढळून आल्यास त्या जमातीमधून दोन प्रतिनिधी लोकसभेवर नामनिर्देशित करण्याचा राष्ट्रपतीला अधिकार आहे.

४. संविधानाच्या कलम १०८ नुसार एखाद्या विधेयकाच्या बाबतीत (धन विधेयक व घटनादुरूस्ती विधेयक वगळता) संसदेच्या दोन्ही सभागृहात मतभेद निर्माण झाल्यास राष्ट्रपती दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक बोलावू शकतो. अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी लोकसभेचा सभापती असतो. आजपर्यंत केवळ तीन वेळा संसदेची संयुक्त बैठक बोलाविण्यात आली.

५. अर्थविषयक विधेयक, घटक राज्यांच्या सीमा वा नावे बदलण्यासंबंधीची विधेयके, व्यापारावर निर्बंध घालण्याविषयीची विधेयके संसदेत सादर केली जाण्यापूर्वी त्यांना राष्ट्रपतीची पूर्व संमती मिळणे आवश्यक असते.

६. संसदेचे अधिवेशन चालू नसताना विद्यमान परिस्थितीमुळे तातडीचे उपाय योजने आवश्यक आहेत असे राष्ट्रपतीला वाटल्यास संविधानातील कलम १२३ नुसार राष्ट्रपती वटहुकूम किंवा अध्यादेश काढू शकतो. वटहुकूम कायद्याएवढेच महत्त्वाचे असतात. मात्र अशा वटहुकूमांना संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर सहा आठवडयाच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. संसदेनी मान्यता दिली तर वटहुकूम कायदा बनून पुढे सुरू राहतो. मान्यता नाकारली तर वटहुकूम रद्द होतो. तसेच वटहुकूम परत घेण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपतीलाच आहे.

७. राष्ट्रपतीस संसदेच्या संयुक्त अधिवेशनात वा दोन्ही सभागृहात स्वतंत्रपणे भाषण देण्याचा अधिकार आहे.

८. राष्ट्रपती एखाद्या विषयावर संसदेला संदेश पाठवू शकतो.

९. संसदेने मंजूर केलेल्या कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी त्यावर राष्ट्रपतीची सही होणे आवश्यक असते. संसदेने मंजूर केलेले



विधेयक (धन विधेयक व घटनादुरूस्ती विधेयक वगळता) जेव्हा राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठविले जाते तेव्हा राष्ट्रपतीसमोर तीन पर्याय असतात (१) विधेयकास संमती देणे (२) विधेयकास संमती नाकारणे (३) विधेयक फेरविचारासाठी संसदेकडे पाठविणे. याचाच अर्थ असा, की संसदेनी मंजूर केलेल्या विधेयकास राष्ट्रपतीने संमती दिलीच पाहिजे असे त्याचावर बंधन नसते. थोडक्यात राज्यघटनेनी राष्ट्रपतीला नकाराधिकार (Veto Power) दिला आहे. परंतु तो मर्यादित स्वरूपाचा आहे. समजा राष्ट्रपतीने एखादे विधेयक संसदेकडे फेरविचारासाठी पाठविले आणि संसदेने ते विधेयक काही बदलासह किंवा पूर्वीच्या स्वरूपात पून्हा मंजूर केले तर मात्र राष्ट्रपतीला त्या विधेयकास संमती द्यावीच लागते. राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी संसदेनी संमत केलेले 'संसद अपात्रता निवारण दुरूस्ती विधेयक २००६' फेरविचारासाठी संसदेकडे परत पाठविले होते. या विधेयकावर फेरविचार न करता लाभाच्या पदासंदर्भातील हे विधेयक संसदेने पून्हा पूर्वीच्या स्वरूपात मंजूर करून राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठविले. त्यावर डॉ. कलामांना स्वाक्षरी करावी लागली. १९७१ मधील २४ व्या घटनादुरूस्तीनुसार घटनादुरूस्ती विषयक विधेयकाला मान्यता देणे राष्ट्रपतीवर बंधनकारक असते.

१०. घटक राज्याच्या कायदेमंडळांनी मंजूर केलेली काही विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवण्याचा अधिकार राज्यपालास असतो. तसेच राज्याच्या कायदेमंडळाने संमत केलेल्या काही विधेयकांना राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते. अशा विधेयकाच्या संदर्भात राष्ट्रपतीचा नकाराधिकार अमर्याद स्वरूपाचा असतो. राष्ट्रपतीने मान्यता न दिल्यास ती पूर्णपणे रद्द होतात.

११. राष्ट्रपतीस काही महत्त्वाचे अहवाल व शिफारशी संसदेसमोर मांडण्याचे अधिकार असतात. जसे भारताच्या महालेखा परिक्षकाचा अहवाल, केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अहवाल, वित्त आयोगाच्या शिफारशी. यासारखे महत्त्वपूर्ण अहवाल व शिफारशी राष्ट्रपतीमार्फत संसदेत चर्चेसाठी सादर केल्या जातात.

### ३. वित्तीय अधिकार (Financial Powers) :-

भारताच्या राष्ट्रपतीला पुढीलप्रमाणे वित्तीय अधिकार दिलेले आहेत.

१. कोणतेही अर्थविधेयक राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय संसदेसमोर सादर करता येत नाही.

२. राष्ट्रपती प्रत्येक वित्तीय वर्षासाठी वार्षिक वित्तीय विवरणपत्र अर्थमंत्र्याद्वारे



Scanned with OKEN Scanner

संसदेत सादर करण्याची व्यवस्था करतो. संविधानातील कलम ११३ (३) नुसार राष्ट्रपतीची शिफारस असल्याशिवाय कोणतीही अनुदानार्थ मागणी केली जात नाही.

३. केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात करांच्या उत्पन्नाचे वितरण आणि राज्यांना आर्थिक मदत या बाबतीत शिफारशी करण्यापूर्वी कलम २८० नुसार राष्ट्रपती 'वित्त आयोगाची' स्थापना करू शकतात. वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नेमणूका राष्ट्रपतीकडून केल्या जातात. तसेच वित्त आयोगाच्या शिफारशी, भारताच्या महालेखापरिक्षकाने केंद्र सरकारला हिशेबासंबंधी दिलेला अहवाल, वार्षिक आर्थिक पत्रक इत्यादी गोष्टी संसदेसमोर ठेवण्याचे काम राष्ट्रपतीला करावे लागते.

४. देशाच्या आकस्मिक निधीवर राष्ट्रपतीचे नियंत्रण असते. एखाद्या घटक राज्यात प्रसंगोपात आकस्मिक जादा खर्च पडल्यास त्यासाठी या निधीतून पैसे देऊ शकतो. नंतर अशा खर्चास संसदेची मान्यता घेणे आवश्यक असते.

५. मिळकतीवरील कराद्वारे व ताग निर्यात कराद्वारे होणाऱ्या उत्पन्नाचे विभाजन घटक राज्यांमध्ये करण्याचा राष्ट्रपतीस अधिकार आहे.

### ४. न्यायविषयक अधिकार (Judicial Powers) :-

भारताच्या राष्ट्रपतीस प्रत्यक्ष न्यायदान करण्याचा अधिकार नसतो तरी देखील त्या अनुषंगाने राष्ट्रपतीला पुढील न्यायविषयक अधिकार असतात.

१. संविधानातील कलम १२४ नुसार सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या नेमणूका राष्ट्रपतीकडून केल्या जातात. तसेच संसदेनी सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयातील न्यायाधिशावर महाभियोग प्रस्ताव संमत केल्यास राष्ट्रपती अशा न्यायाधिशाला पदच्यूत करू शकतो.

२. न्यायालयाने एखाद्या व्यक्तिला मृत्युदंडाची किंवा इतर गंभीर स्वरूपाची शिक्षा दिली असेल आणि त्या व्यक्तीने राष्ट्रपतीकडे दयेचा अर्ज केला असेल तर राष्ट्रपती त्या व्यक्तिची शिक्षा कमी अथवा माफ करू शकतात. इतकेच नाही तर लष्करी न्यायालयाने दिलेली शिक्षा देखील कमी करण्याचा अथवा माफ करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असतो. अर्थात राष्ट्रपती या अधिकारांचा वापर मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार करीत असतो.

३. केंद्र सरकारच्या किंवा घटक राज्यांच्या कृतीमुळे एखादा घटनात्मक



प्रश्न अथवा वाद निर्माण झाला असेल तर राष्ट्रपतीला सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेण्याचा अधिकार असतो. परंतु सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला पाळणे मात्र राष्ट्रपतीवर बंधनकारक नसते.

४. सर्वोच्च न्यायालयांनी आपल्या कामकाज पध्दती विषयी जे नियम केलेले असतात त्या नियमांना राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते.

### ५. आणीबाणी विषयक अधिकार (Emergency Powers) :-

भारतीय संविधानाच्या अठराव्या भागात कलम ३५२ ते ३६० मध्ये राष्ट्रपतीच्या आणीबाणी विषयक अधिकाराचे वर्णन करण्यात आले आहे. देशात असाधारण परिस्थिती निर्माण झालीतर तिचा मुकाबला करण्यासाठी संविधानात खास तरतूदी करून ठेवणे आवश्यक होते. म्हणूनच राष्ट्रपतीच्या आणीबाणी विषयक अधिकारांची तरतूद केली आहे. राष्ट्रपती तीन प्रकारच्या परिस्थितीत देशात आणीबाणीची घोषणा करू शकतो.

१. युध्द किंवा बाहय आक्रमण किंवा अंतर्गत सशस्त्र उठाव यामुळे उद्‌भवणारी आणीबाणीची परिस्थिती (राष्ट्रीय आणीबाणी) कलम ३५२.

२. घटक राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोसळल्यामुळे उद्‌भवणारी आणीबाणीची परिस्थिती (घटक राज्यातील आणीबाणी) कलम ३५६.

३. भारताच्या आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण झाल्यामुळे उद्‌भवणारी आणीबाणीची परिस्थिती (आर्थिक आणीबाणी) कलम ३६०.

### राष्ट्रीय आणीबाणी :-

संविधानातील कलम ३५२ नुसार युध्द अथवा बाहय आक्रमण अथवा अंतर्गत सशस्त्र उठाव यामुळे भारताच्या किंवा भारतातील एखाद्या प्रदेशाच्या सुरक्षिततेला धोका आणणारी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो एक जाहिरनामा काढून आणीबाणीची घोषणा करू शकतो. १९७८ साली केलेल्या ४४ व्या घटना दुरूस्तीनुसार आणीबाणीची घोषणा करण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाने लेखी शिफारस करणे आवश्यक आहे. अन्यथा राष्ट्रपती आणीबाणीची घोषणा करू शकत नाही.

आणीबाणी जाहीर करण्यासारखी परिस्थिती खरोखरच देशात आहे काय? हे पाहण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार ४२ व्या राज्यघटना दुरूस्तीने काढून



Scanned with OKEN Scanner

घेतला होता तो ४४ व्या घटना दुरूस्तीने पुन्हा देण्यात आला. यामुळे आणीबाणीच्या जाहीरनाम्याची संवैधानिकता तपासण्याचा तसेच आणीबाणी घोषित करण्यामागे काही वाईट हेतू तर नाहीना हे पाहण्याचा अधिकार न्यायालयांना असतो.

राष्ट्रपतीने काढलेल्या आणीबाणीच्या जाहीरनाम्याची मुदत ३० दिवसांची असते. त्यामुळे आणीबाणीच्या जाहीरनाम्यास ३० दिवसांच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. आणीबाणी घोषित करण्याच्या वेळी लोकसभा विसर्जीत झालेली असेल किंवा एक महिन्याच्या कालावधीत विसर्जित झालेली असेल तर राज्यसभेची संमती घ्यावी लागते. परंतु नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवसांच्या आत आणीबाणीच्या घोषणेस मान्यता मिळणे आवश्यक असते. मान्यता न मिळाल्यास ती रद्द होते.

आणीबाणीच्या घोषणेला मान्यता मिळाल्यास एका वेळी सहा महिन्याच्या कालावधीसाठी आणीबाणीची परिस्थिती कायम राहाते. मात्र त्यासाठी संसदेनी एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने संमती देणे आवश्यक आहे.

भारतात ३५२ व्या कलमानुसार १९६२ साली भारत-चीन युध्दाच्यावेळी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी आणीबाणीची घोषणा जाहीर केली होती. त्यानंतर १९७१ साली बांग्लादेशाच्या युध्दाच्यावेळी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी आणीबाणीची घोषणा केली व १९७५ साली अंतर्गत अशांततेच्या कारणामुळे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी देशात आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली.

**राष्ट्रीय आणीबाणीचे परिणाम**

१. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात केंद्र सरकारला घटक राज्यांनी आपल्या कार्यकारी सत्तेची अंमलबजावणी कशाप्रकारे करावी यासंबंधी आदेश देता येतो.

२. राज्य सूचीतील कोणत्याही विषयासंबंधी कायदेकरण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो.

३. आणीबाणीच्या काळात राष्ट्रपतीला केंद्र-राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाविषयीच्या घटनात्मक तरतूदीत बदल करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

४. लोकसभेच्या कार्यकालात वाढ करण्यासंबंधीचा कायदा संसद संमत करू शकते.

५. नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संदर्भात न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क राष्ट्रपती स्थगित ठेऊ शकतो. (अपवाद कलम २० व २१)



६. आणीबाणीच्या काळात घटनेच्या १९ व्या कलमातील तरतूदी स्थगित होऊ शकतात.

**घटक राज्यातील आणीबाणी :-**

प्रत्येक घटक राज्याचा कारभार घटनात्मक तरतुदीप्रमाणे चालू आहे किंवा नाही हे पाहण्याचे केंद्र सरकारचे कर्तव्ये असेल असे संविधानाच्या कलम ३५५ मध्ये नमूद करण्यात आले आहे. म्हणजेच घटक राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्यघटनेंनी केंद्र सरकारला दिला आहे. म्हणूनच एखाद्या घटक राज्याचे सरकार घटनात्मक तरतूदीला अनुसरून कामे करू शकत नसेल किंवा राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला असेल अशी त्या राज्याच्या राज्यपालाकडून आलेल्या अहवालाच्या आधारे किंवा अन्य मार्गाने राष्ट्रपतीची खात्री पटली तर राष्ट्रपती कलम ३५६ नुसार एक जाहीरनामा काढून त्या राज्यात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याची घोषणा करू शकतो.

घटक राज्यातील आणीबाणीचा जाहीरनामा दोन महिन्याच्या कालावधीपुरता असतो. वरील मुदतीत संसदेची मान्यता मिळणे आवश्यक असते. जर त्यावेळी लोकसभा विसर्जित झाली असेल तर राज्यसभेची मान्यता घ्यावी लागते व नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून तीस दिवसांच्या आत त्या घोषणेला लोकसभेची मंजूरी घ्यावी लागते. संसद एकावेळी या घोषणेची मुदत सहा महिन्यासाठी वाढवू शकते. ही आणीबाणी कोणत्याही परिस्थितीत तीन वर्षापेक्षा अधिक काळ अंमलात राहू शकत नाही. ४४ व्या घटनादुरूस्तीने अशी तरतूद केली आहे, की या आणीबाणीची मुदत एका वर्षाच्या पलीकडे वाढवावयाची असल्यास एकतर संपूर्ण देशात किंवा देशाच्या भागात आणीबाणी लागू असली पाहिजे आणि दुसरे म्हणजे निवडणूका घेण्यासारखी स्थिती त्या राज्यात नाही असा दाखला निर्वाचन आयोगाने दिला पाहिजे.

**घटक राज्यातील आणीबाणीचे परिणाम :-**

१. राष्ट्रपती संबंधीत घटकराज्यांच्या शासनसंस्थेची कोणतीही किंवा सर्व कामे आपल्याकडे घेऊ शकते. (न्यायालयीन सत्ता वगळता)

२. राज्याच्या कायदेमंडळाचे अधिकार संसदेकडून वापरण्यात येतील असे राष्ट्रपती जाहीर करू शकतो.



Scanned with OKEN Scanner

३. आणीबाणीची उद्दिष्टये साध्य करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रपती योग्य त्या तरतूदी करू शकतो.

४. लोकसभेचे अधिवेशन चालू नसेल आणि त्या राज्याच्या खर्चाला संसदेची मान्यता मिळालेली नसेल तेव्हा देशाच्या संचित किंवा एकत्रित निधीतून खर्च करण्याचा आदेश राष्ट्रपती काढू शकतो.

५. संसदेचे अधिवेशन सुरू नसताना गरज भासल्यास राष्ट्रपती संबंधीत राज्याच्या प्रशासनाखातर अध्यादेशही काढू शकतो.

राजकीय पेचप्रसंग किंवा राजकीय अस्थिरतेच्या नावाखाली भारतात सर्वाधिक वेळा घटक राज्यातील आणीबाणी राष्ट्रपतींनी घोषित केली.

**आर्थिक आणीबाणी :-**

भारताचे किंवा भारतातील कोणत्याही भागाचे आर्थिक स्थैर्य किंवा पत धोक्यात आली आहे अशी जर राष्ट्रपतीची खात्री झाली तर भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६० अन्वये तो एक जाहीरनामा काढून आर्थिक आणीबाणीची घोषणा करू शकतो. अन्य प्रकारच्या आणीबाणीप्रमाणेच आर्थिक आणीबाणीच्या घोषणेस संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवावे लागते. या घोषणेचा कालावधी दोन महिन्याचा असतो व त्यात वाढ करण्याचा अधिकार संसदेला असतो.

**आर्थिक आणीबाणीचे परिणाम :-**

राष्ट्रपतीने जारी केलेल्या आर्थिक आणीबाणीच्या घोषणेचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात.

१. आर्थिक आणीबाणीच्या काळात कोणत्याही घटक राज्याला आर्थिक व्यवहाराविषयीच्या तत्त्वांचे पालन करण्यासंबंधीचा आदेश देण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्राप्त होतो. या आदेशानुसार राज्य सरकारच्या नोकरांचे वेतन व भत्ते कमी करण्याच्या बाबींचा समावेश होतो.

२. राष्ट्रपती, घटक राज्यांच्या विधीमंडळांनी मंजूर केलेली सर्व आर्थिक विधेयके आपल्या संमतीसाठी मागविण्याचा आदेश देऊ शकतो.

३. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशापासून ते केंद्रीय प्रशासनातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंतच्या सर्व नोकरांचे पगार व भत्ते यात कपात करण्याचा आदेश राष्ट्रपती देऊ शकतो.

४. महसूल उत्पनाच्या वाटणीसंबंधी राष्ट्रपतीला सुधारणा व तरतूदी



करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

राष्ट्रपतीला आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार असला तरीही भारतात आजपर्यंत आर्थिक आणीबाणीची घोषणा करण्यात आली नाही.

**राष्ट्रपतीचे स्थान (Position of the President) :-**

राष्ट्रपतीच्या वरील सर्व अधिकाराचे विश्लेषण पाहिल्यानंतर त्यांच्या अधिकाराची व्याप्ती खूपच मोठी आहे असे लक्षात येते. आपल्या राज्यघटनेतील तरतुदींचा विचार केल्यास जगातील सामर्थ्यसंपन्न व प्रभावशाली राज्यप्रमुखात भारताच्या राष्ट्रपतीचा समावेश करण्यास कोणतीही अडचण येणार नाही. राष्ट्रपतीस सर्वसाधारण परिस्थितीत व आणीबाणीच्या काळात जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्यानुसार ते निरंकुश शासक बनू शकतात. मात्र संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केल्यामुळे आपले राष्ट्रप्रमुख हे नाममात्र असून वास्तविक शासनप्रमुख हे पंतप्रधान व त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिपरिषद आहे. राज्यघटनेनी यांना जे अधिकार दिले आहेत ते सर्व अधिकार प्रत्यक्षात पंतप्रधानच वापरतात. घटनाकारांनाही असेच अपेक्षित होते.

राष्ट्रपतीच्या स्थानाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत असे मत व्यक्त केले होते, की "भारताच्या राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे आहे. ते राज्याचे प्रमुख असले तरी ते कार्यकारी मंडळाचे प्रमुख नाहीत. ते राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतात; पण राष्ट्राचे शासन चालवू शकत नाहीत." घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी असे म्हटले होते, की "राष्ट्रपतीने त्यांच्या मंत्र्यांचा सल्ला स्वीकारला पाहिजे, अशी घटनेत तरतूद नसली तरी इंग्लंडमध्ये राजाने मंत्र्यांच्या सल्ल्यानुसारच कार्य करावे असा जो संकेत आहे तोच संकेत या देशात रूढ करण्यात येईल आणि राष्ट्रपती हा सर्व बाबतीत घटनात्मक अध्यक्षच राहील." भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेही राष्ट्रपतीच्या स्थानासंबंधी म्हटले आहे, की "भारताचा राष्ट्रपती हा कार्यकारी मंडळाचा घटनात्मक प्रमुख असून वास्तविक कार्यकारी सत्ता मंत्र्याच्या किंवा मंत्रिपरिषदेच्या हाती देण्यात आली आहे."

यासंबंधी काही घटनातज्ज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे, की भारताचा राष्ट्रपती हा इंग्लंडच्या राजासारखा नामधारी राज्यप्रमुख नाही. तो भारताचा निर्वाचित राज्यप्रमुख असल्याने त्यांना काही अधिकार असणे स्वाभाविकच आहे. भारताने संसदीय शासन पध्दती बरोबरच संघराज्यपध्दतीचा स्वीकार केला आहे.



Scanned with OKEN Scanner

राष्ट्रपती हा संघराज्यांचा प्रमुख असल्याने त्यांना केंद्र शासनाप्रमाणेच घटक राज्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांना संघ व राज्य शासनाची काळजी करावी लागते. या दोन्ही शासनात समन्वय, सामंजस्य आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याची जबाबदारी राष्ट्रपतीचीच आहे. राष्ट्रपतीच्या निवड करण्याच्या कार्यात संसद सदस्याबरोबरच राज्यांच्या विधानसभा सदस्यांचाही समावेश केलेला आहे. त्यामुळे राष्ट्रपतीला, संघराज्याच्या संरक्षणासाठी काही अधिकाराचा प्रत्यक्षात वापर करावाच लागतो. राष्ट्रपतीला पदग्रहण करतांना घटनेचे रक्षण करण्याची शपथ घ्यावी लागते. त्या अनुषंगाने ते कार्य करतात.

बहुसंख्य घटना तज्ज्ञ व राज्यशास्त्रज्ञ यांच्या मते राष्ट्रपती हे केवळ घटनात्मक प्रमुख असून मंत्रिमंडळाचा सल्ला त्यांच्यावर बंधनकारक आहे. संसदीय शासन पध्दतीच्या स्वीकारामुळे संसदेला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळामार्फत देशाचा राज्यकारभार चालविला जातो, म्हणून राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय अधिकाराचा वापर केल्यास देशात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होईल. म्हणून त्यांच्या सल्ल्यानुसारच राष्ट्रपती आपल्या अधिकाराचा वापर करतात.

राष्ट्रपतीला स्वतःचे अधिकार नसल्यामुळे ते कोणत्याही परिस्थितीत देशाची सत्ता सुत्रे आपल्या हाती घेऊ शकत नाहीत. अगदी भारताच्या लोकसभेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही तरीही अशावेळी लोकसभेतील एखाद्या पक्षाच्या नेत्याला हंगामी मंत्रिमंडळ स्थापन करण्यास सांगून लोकसभा बरखास्त करून नव्याने निवडणूका घेण्याचा आदेश देऊन नवीन मंत्रिमंडळ अधिकारावर येईपर्यंत हंगामी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने देशाचा कारभार चालवित असतो. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीने ७४ (१) कलमात बदल करून असे स्पष्ट करण्यात आले, की राष्ट्रपतीला त्यांच्या कामात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिपरिषद असेल व मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसारच राष्ट्रपती कृती करतील अशी तरतूद करण्यात आली. यानुसार मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार कृती करण्यास या घटनादुरूस्तीने बंधन घातले गेले. १९७८ च्या ४४ व्या घटना दुरूस्तीने त्यात पुन्हा भर घालून मंत्रिमंडळाच्या सल्ल्यावावत फेरविचार करण्यास राष्ट्रपती सांगू शकतात परंतु मंत्रिमंडळाने पुन्हा तोच सल्ला दिला असेल तर मात्र स्वीकारणे राष्ट्रपतीवर बंधनकारक असते.

आजपर्यंतच्या राष्ट्रपतीच्या अधिकारांचा आढवा घेतल्यास आपल्या राष्ट्रपतींनी आपल्या पदाच्या मर्यादा लक्षात घेऊनच आपल्या अधिकाराचा वापर केला आहे.



Scanned with OKEN Scanner